**ठळक बातम्या**

- कारागिर बनण्याऐवजी उद्योजक होण्यावर लक्ष देण्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं वर्ध्यातून आवाहन
- मार्च २०२६ पर्यंत देशाला नक्षलवाद मुक्त करण्याचं सरकारचं उद्दिष्ट असल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचं प्रतिपादन
- जालन्यात ट्रक आणि बसची धडक होऊन झालेल्या अपघातात ६ जण ठार

**आणि**

- भारत विरुद्ध बांगलादेश कसोटी क्रिकेट मालिकेत बांगलादेशचा डाव गडगडला

**<><><><><>**

समाजातल्या उपेक्षित वर्गातून येणाऱ्या कारागीरांनी फक्त कारागीर होऊन राहू नये, तर त्यांनी उद्योजक म्हणून उभं राहावं, असं आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केलं. वर्धा इथं प्रधानमंत्री विश्वकर्मा योजनेच्या वर्षपूर्तीनिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. आकडेवारीनुसार या योजनेचा सर्वाधिक फायदा अनुसूचित जाती, अनुसूजित जमाती आणि इतर मागासवर्गीय समुदायांतल्या नागरिकांनी घेतल्याचं मोदी यांनी सांगितलं. या कार्यक्रमात प्रधानमंत्र्यांच्या हस्ते आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्रं आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महिला स्टार्टअप योजनेचा प्रारंभ झाला. तसंच अमरावतीच्या पीएम मित्र टेक्सटाइल पार्कचं भूमिपूजन आणि प्रधानमंत्री विश्वकर्मा योजनेच्या वर्षपूर्तीनिमित्त विशेष टपाल तिकिटाचं अनावरण त्यांनी केलं. या योजनेच्या एक लाख लाभार्थ्यांना ओळखपत्रं आणि प्रमाणपत्रांचं प्रतीकात्मक वितरण, एक लाख लाभार्थ्यांना डिजिटल कौशल्य प्रमाणपत्रांचं वितरण, ७५ हजार लाभार्थ्यांना

डिजिटल कर्जाचं वाटप, तसंच १८ कारागीरांना धनादेशांचं प्रातिनिधिक स्वरूपात वाटपही प्रधानमंत्री मोदी यांनी केलं. महाराष्ट्राने आता नव्या औद्योगिक क्रांतीसाठी कंबर कसली आहे, असं सांगून आपण सर्वजण एकत्र येऊन महाराष्ट्राची अस्मिता टिकवून ठेवू, परंपरा आणि प्रगतीच्या मार्गाने पुढे जाऊ, असं आवाहन प्रधानमंत्र्यांनी केलं.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात महाराष्ट्राचा विकास बुलेट ट्रेनच्या वेगाने होईल, असा विश्वास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या कार्यक्रमात बोलताना व्यक्त केला. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी तयार केलेल्या राज्यघटनेनं दिलेलं आरक्षण कुणीही काढून घेऊ शकणार नाही, या बाबीचा पुनरुच्चार त्यांनी केला.

सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग क्षेत्र हा भारताच्या अर्थव्यवस्थेचा महत्त्वपूर्ण स्तंभ असल्याचं प्रतिपादन या खात्याचे मंत्री जितन राम मांझी यांनी केलं. २०४७पर्यंत आत्मनिर्भर आणि विकसित भारताची उभारणी करण्यात हे क्षेत्र महत्त्वाचं योगदान देईल, असंही त्यांनी नमूद केलं.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी, या कार्यक्रमाच्या माध्यमातून आज साडेसहा लाख कुटुंबांचं चित्र बदलणार असल्याची ग्वाही दिली. राज्य सरकार समाजातल्या सर्व घटकांच्या पाठीशी उभं असून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशात सुरू केलेलं परिवर्तन आपल्या सरकारनं राज्यात सुरू केलं असल्याचं प्रतिपादन त्यांनी केलं.

प्रधानमंत्र्यांच्या हस्ते आज भूमिपूजन झालेल्या मित्रा टेक्सटाइल पार्कमुळे विदर्भाच्या मातीतल्या पांढऱ्या सोन्याला खरी किंमत मिळेल, असा विश्वास उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केला.

राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, कौशल्य विकास आणि स्वयंउद्योजकता राज्यमंत्री जयंत चौधरी, राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत, कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्री मंगलप्रभात लोढा, उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे आणि इतर या कार्यक्रमाला उपस्थित होते.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्यापासून तीन दिवसांच्या अमेरिकेच्या दौऱ्यावर जात आहेत. तिथल्या डेलावेअर इथं होणाऱ्या क्वाड देशांच्या परिषदेत ते सहभागी होणार आहेत. या दौऱ्यात प्रधानमंत्री विविध परदेशी अधिकाऱ्यांशी तसंच अमेरिकेतील भारतीय जनसमुदायाशी संवाद साधणार आहेत.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या पुढाकारामुळे राज्यात विविध प्रकल्पांची सुरुवात आणि पायाभूत सुविधांचा विकास होत आहे. मात्र, राज्याला बदनाम करण्याचे धोरण विरोधकांनी आखल्याची टीका मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली. नागपूर विमानतळावर काल ते वार्ताहरांशी बोलत होते.

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेच्या यशामुळे विरोधकांच्या पायाखालची वाळू सरकली आहे, त्यामुळे ते जनतेची दिशाभूल करत असल्याचंही मुख्यमंत्री शिंदे यावेळी म्हणाले.

**<><><><><>**

मार्च २०२६ पर्यंत देशाला नक्षलवाद मुक्त करण्याचं सरकारचं उद्दिष्ट्य असल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आज म्हणाले. नक्षलग्रस्त भागातल्या ५५ व्यक्तींची त्यांनी दिल्लीत भेट घेतली. तेव्हा ते बोलत होते. बस्तर मधले ४ जिल्हे

वगळता देशातून नक्षली नष्ट झाल्याच ते म्हणाले. इतरांनीही शस्त्र टाकून, हिंसाचार सोडून शरण यावं असं आवाहन त्यांनी केलं. सरकारच्या आवाहनाला प्रतिसाद न देणाऱ्यांच्या विरोधात मोठी कारवाई करण्याचा इशारा त्यांनी यावेळी दिला.

**<><><><>**

महारेरा म्हणजेच महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरणाच्या अध्यक्ष म्हणून मनोज सौनिक यांनी आज पदभार स्वीकारला. गृहनिर्माण मंत्री अतुल सावे यांनी सौनिक यांना आज मंत्रालयात पद आणि गोपनियतेची शपथ दिली.

**<><><><>**

जालना वडीगोद्री मार्गावर शहापूर गावाजवळ आज सकाळी आठ वाजण्याच्या सुमारास बस आणि आयशर ट्रकची धडक होऊन झालेल्या अपघातात बसच्या वाहकासह ६ जण ठार तर १० जण जखमी झाले आहेत. जखमी पैकी तीन जणांची प्रकृती गंभीर आहे. बीड जिल्ह्यातल्या गेवराई इथून जालन्याकडे जाणारी बस आणि जालन्याहून बीडकडे मोसंबी घेऊन जाणाऱ्या ट्रकची समोरासमोर धडक झाल्याने हा अपघात झाला. बसमध्ये एकूण २४ प्रवासी होते. अपघातातल्या किरकोळ जखमींना अंबड इथल्या प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचारासाठी हलवण्यात आलं आहे.

**<><><><>**

धर्मवीर, स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज मुंबई किनारी रस्ता (दक्षिण) प्रकल्पातील वाहतूक व्यवस्था आता आठवड्यातले सातही दिवस सकाळी ७ ते रात्री १२ वाजेपर्यंत सुरू राहणार आहे. गणेशोत्सवादरम्यान हा प्रकल्प २४ तास वाहतुकीसाठी खुला होता.

**<><><><>**

राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत वाशीम जिल्ह्यातल्या हृदयविकारानं ग्रस्त असलेल्या १८ बालकांवर मुंबईतल्या बालाजी रुग्णालयात मोफत हृदय शस्त्रक्रिया केली जाणार आहे. यासाठी ही मुले काल वाशीमहून रवाना झाली.

<><><><><>

सोलापूर विमानतळाबाबत केंद्रीय नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या अध्यक्षतेखाली काल नवी दिल्लीत एक उच्च स्तरीय बैठक झाली. सोलापूरच्या विकासाठी आवश्यक असणारी विमानतळाची मागणी पूर्ण होणार असून नोव्हेंबर महिन्यात विमानसेवा सुरु होण्याची शक्यता आहे. सोलापूर ते गोवा, तिरुपती, हैद्राबाद आणि मुंबई या मार्गांना प्राधान्य दिलं  जाणार आहे.

<><><><><>

भारतीय मजदूर संघाने काल जळगाव जिल्हाधिकारी कार्यालयासमोर  धरणे आंदोलन केलं. निवृत्तीवेतन महागाई निर्देशांकाशी जोडलेलं असावं, किमान निवृत्तीवेतन ५००० करावं,जुनी निवृत्तीवेतन योजना लागू करावी.  सामाजिक सुरक्षा कोड लागू करावा, पाच वर्षे झालेल्या उद्योगामधल्या कर्मचाऱ्यांसाठी किमान वेतन लागू करावं, अंगणवाडी, आशा कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत सामावून घ्यावं या मागण्यांसाठी काल मजदूर संघानं देशभरात आंदोलन केलं. याचाच भाग म्हणून जळगावात ही  निदर्शनं झाली.

<><><><><>

शांगझोऊ इथे सुरू असलेल्या चीन खुल्या बॅडमिंटन स्पर्धेतलं मालविका बनसोडचं आव्हान संपुष्टात आले आहे. दोन वेळा विश्वविजेती ठरलेल्या जपानच्या आकाने यामागुची हिने मालविकाला उप उपांत्यपूर्व फेरीत दोन सलग गेममध्ये

हरवत उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे. महिला एकेरीत ४३ व्या क्रमांकावर असलेली मालविका बनसोड ही सुपर १००० बॅडमिंटन स्पर्धेत पी व्ही सिंधू आणि सायना नेहवाल यांच्यानंतर उपांत्यपूर्व फेरीपर्यंत पोहोचणारी तिसरी भारतीय महिला ठरली होती.

**<><><><><>**

हंगेरीत बुडापेस्टमध्ये सुरु असलेल्या पंचेचाळिसाव्या बुद्धीबळ ऑलिंपियाडमध्ये आठव्या डावात भारताने इराणवर आघाडी घेतली. महिला संघाला मात्र पोलंडकडून पराभव पत्करावा लागला. भारताच्या पुरुष संघाने याआधीचा एकही डाव गमावलेला नाही. त्यामुळे त्यांची सुवर्णपदकाकडे वाटचाल सुरु आहे. आठव्या डावानंतर भारत, कझाकस्तान आणि पोलंड या प्रत्येक महिला संघाकडे १४ गुण असल्यामुळे तिहेरी बरोबरी झाली.

**<><><><><>**

नवीन फौजदारी कायदे समजून घेऊन गुन्हेगारांना शिक्षा करण्याऐवजी गुन्हे रोखण्यावर भर देण्याचं आवाहन केंद्रीय गृह राज्यमंत्री नित्यानंद राय यांनी आज केलं. भारतीय पोलीस सेवेतल्या अधिकाऱ्यांच्या पासिंग आऊट परेडमध्ये ते हैदराबादमधल्या सरदार वल्लभभाई पटेल राष्ट्रीय पोलीस अकादमीत बोलत होते. तांत्रिक कौशल्य विकसित करुन सायबर गुन्हेगारीचा सामना करण्याचं आवाहन त्यांनी केलं. एकूण २०७ अधिकाऱ्यांचं प्रशिक्षण आज पूर्ण झालं. त्यात देशातले १८८ आणि भूतान, नेपाळ आणि इतर देशातले १९ अधिकारी यात होते. यामध्ये ५८ महिला अधिकाऱ्यांचा समावेश आहे.

**<><><><><>**

तिरुपती इथल्या प्रसादाच्या लाडूंमध्ये प्राण्यांची चरबी असल्याचा मुद्दा गंभीर असल्याचं केंद्रीय अन्नमंत्री प्रल्हाद जोशी यांनी म्हटलं आहे. ते आज नवी दिल्लीत पत्रकारांशी बोलत होते. आंध्र प्रदेशच्या मुख्यमंत्र्यांनी हा मुद्दा उपस्थित केला असून प्रसादाच्या लाडूंसाठी तयार करण्यात आलेल्या तुपात प्राण्यांची चरबी आढळल्याची पुष्टी राष्ट्रीय दुग्धविकास मंडळाच्या प्रयोगशाळेने दिली आहे. या प्रकरणाची सविस्तर चौकशी करून दोषींना शिक्षा झाली पाहिजे असं जोशी म्हणाले.

**<><><><><>**

पश्चिम बंगालमध्ये संपावर असलेल्या कनिष्ठ डॉक्टरांनी आपत्कालीन आणि अत्यावश्यक वैद्यकीय सेवांमध्ये उद्यापासून काम सुरु करण्याची घोषणा केली आहे. सरकारनं संपावर असणाऱ्या डॉक्टरांच्या बहुतांश मागण्या मान्य केल्यानंतर राज्यातली पूर परिस्थिती लक्षात घेत हा निर्णय घेतल्याची घोषणा डॉक्टरांच्या संघटनेनं केली आहे.

**<><><><><>**

चेन्नईत एम एम चिदंबरम मैदानावर सुरु असलेल्या भारत आणि बांगलादेश यांच्यातल्या कसोटी सामन्यात भारताचा पहिला डाव ३७६ धावात आटोपला. सामन्याच्या आजच्या दुसऱ्या दिवशी भारताने कालच्या ३३९ धावांवर डाव सुरु केला आणि ३७ धावात भारताचे उरलेले चार फलंदाज बाद झाले. आर. अश्विन यांनं ११३ धावा केल्या. बांग्लादेशाच्या हसन महमूदनं भारताचे ५ गडी टिपले.

बांगलादेशच्या पहिल्या डावाची सुरुवातही खराब झाली. अवघ्या ४० धावात त्यांचे ५ गडी तंबूत परतले होते. जसप्रित बुमराहनं त्यांचे ४ बळी टिपले. शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा बांगलादेशच्या ९ गडी बाद १३३ धावा झाल्या होत्या.